# जनसंपर्क अधिकारी


**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार**

**पोलीस आयुक्त यांचे कार्यालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. २२-२२** **दिनांक २६/०१/२०२२**

## मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने प्रजासत्ताक दिन साजरा.

दिनांक २६/०१/२०२२ रोजी प्रजासत्ताक दिनानिमीत्त मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने पोलीस आयुक्त कार्यालय येथे ध्वजारोहण करून राष्ट्रीय ध्वजास मानवंदना देण्यात आली. कोरोनाच्या पार्श्वभुमीवर शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यात येवून सदरील ध्वजारोहण कार्यक्रम पार पाडण्यात आला. ध्वजारोहणाच्या कार्यक्रमप्रसंगी मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त यांनी उपस्थित अधिकारी व अंमलदार यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच पोलीस दलामध्ये भरती होणाऱ्या प्रत्येक पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी खात्यातील पहिल्या दिवसापासून ते सेवानिवृत्तीच्या शेवटच्या दिवसांपर्यत देशातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रामाणिक राहून कर्तव्य करायला हवे अशी अपेक्षा व्यक्त करून मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे नालासोपारा विभागाचे सहायक पोलीस आयुक्त श्री. चंद्रकांत जाधव यांना पोलीस दलातील उत्कृष्ट सेवेबद्दल राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याने मा. पोलीस आयुक्त यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.



